B.A. (CBCS Pattern) Semester-IV

# BA12B-2 - Marathi Literature

P. Pages : 3 GUG/S/25/12066

Time : Three Hours * 1 8 7 2 * Max. Marks : 80

---

**1.** ‘तुतारी’ कवितेतील सामाजिक आशय उलगडून दाखवा. **16**

**किंवा**

बा.सी.मर्ढेकरांच्या काव्याची वैशिष्ट्ये विशद करा.

**2.** ‘शीगवाला’ कवितेचे रसग्रहण करा. **16**

**किंवा**

‘तिफन’ या कवितेतून कवी विठ्ठल वाघ यांनी शेतकऱ्यांच्या जीवनाचे वर्णन कसे केले आहे?

**3.** पुढीलपैकी **कोणत्याही एकाच** गटातील काव्यपंक्तीचे संदर्भासह अर्थ स्पष्ट करा. **16**

**गट – अ**

क) आम्हाला वगळा - गतप्रभ क्षणी होतील तारांगणे।
आम्हाला वगळा - विकेल कवडीमोलावरी हे जिणे !

ख) ‘प्रेमाचे लव्हाळे,
सौंदर्य नव्हाळे
शोधू?
आसपास
मुडद्याची रास’

ग) मिरवणुकीच्या मध्यभागी
माझ्या खांद्यावर त्याचा बॅनर होता.
जानकी अक्का म्हणाली, ‘वळिखलंस ह्याला –
ह्यो आमचा मार्कसबाबा

घ) “अखाळीले जारे तुमी माहा वावर पंढरी
हाले भळाच्या पानात झेंडी इठोबाची खरी
नाही ठाऊक देहूचा कसा अबिराचा टिका
कायी माती लावली तं इठू भुलसील तुका’

**किंवा**

**गट – आ**

च) ‘जिकडे जावें तिकडे माझी भावंडे आहेत,
सर्वत्र खुणा माझ्या घरच्या मजला दिसताहेत;
कोठेही जा - पायाखाली तृणावृता भू दिसते,
कोठेही जा - डोईवरते दिसते नीलांबर तें!’

छ) मागील पाणी गढूळ आलं
पुढल्या पाण्यानं किती जपावं
हां हां म्हणता वणवा आला
एका झाडानं किती टकरावं

ज) ‘आपण नकळत
पिंजत राहतो स्वत:ला
भल्याबुल्या संकेतांनी
आणि मग हाताला लागतात
अवघड पापुद्रे
ठावही न सापडणाऱ्या
तळाचे

झ) ‘तू समुद्र पार करून जातेस गुजगोष्टींचा
तर तुझ्या संवादाची वाळू
माझ्या स्वप्नांना गच्च गच्च चिकटलेली
तू गुदगुल्या करतेस स्वप्नांना’

**4.** पुढीलपैकी **कोणत्याही एकाच** गटातील प्रश्नांची उत्तरे सुमारे शंभर शब्दात लिहा. **16**

**गट – क**

त) ‘बाई’ या कवितेतून कोणता आशय सूचित होतो?

थ) ‘तुम्ही प्रकाशाचे पुंजके’ व्हा असे दया पवार का म्हणतात?

द) ‘अभिरूची’ म्हणजे काय?

ध) साहित्याचे प्रमुख प्रकार कोणते?

**किंवा**

**गट – ख**

प) 'गोंदण' या कवितेतून कवी भुजंग मेश्राम यांनी आदिवासी स्त्रीचे दु:ख कसे व्यक्त केले आहे?

फ) 'माणूस माणुसकी विसरत चालल्याची खंत' कवी विठ्ठल वाघ यांनी 'मानूस' या कवितेतून कशी व्यक्त केली?

ब) 'नाटक' म्हणजे काय?

भ) अभिरूची आणि रसिकता यांच्यातील संबंध सांगा.

**5.** पुढील सर्व प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. **16**

1) कवी केशवसुतांनी विद्यार्थ्यांमध्ये असणाऱ्या श्रेष्ठ गुणांचे वर्णन कसे केले आहे?

2) आदिवासी जमातीची असहायता 'सुर्यशिकार' या कवितेतून कशी व्यक्त झाली आहे?

3) अभिरुची भिन्नतेची कारणे सांगा.

4) कादंबरी म्हणजे काय?

***********